बुधवार दि.५ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१७१ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

## पंकजा मुंडेंनी केले धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याचे स्वागत


# देर आए दुरुस्त आए; देशमुखांच्या जीवाच्या वेदनांपुढे मोठा निर्णय नाही

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

भाजप नेत्या आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याचे स्वागत केले आहे. धनंजय मुंडेंचा राजीनामा फार आधीच व्हायला हवा होता. धनंजयने देखील आधीच राजीनामा द्यायला पाहिजे होता, असे त्या म्हणाल्या. धनंजय मुंडेचा राजीनामा घेणाऱ्यांनी आधी घेतला असता, तर त्याला गरिमामय एक मार्ग मिळाला असता. खुर्चीवर बसून विचार करताना राज्याच्या प्रत्येकाच्या सारख्याचा विचार केला पाहिजे. संतोष देशमुखांच्या जीवाच्या, परिवारांच्या वेदनांपुढे हा निर्णय मोठा नाही. देर आए दुरुस्त आए, अशी प्रतिक्रिया पंकजा मुंडे यांनी दिली.महाराष्ट्रा, मुंबईत काय चाललेय ते नागपूरमध्ये माहिती नव्हते. इन्स्टाग्रामवरची पोस्ट बघून मुंबईत काय चाललेय ते माहिती आहे. मी जे व्यक्त होत आहे त्याचा सन्मान ठेवावा, हा विषय अत्यंत मानवी विषय आहे. माणुसकीचा विषय आहे, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.

मी पंकजा गोपीनाथ मुंडे आहे. त्यामुळे मी या विषयावर व्यक्त होणे आपल्याला अपेक्षा आहे. त्याप्रमाणे मी व्यक्त होत आहे. हा विषय माणुसकीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. संतोष देशमुखांना मारण्याच्या संदर्भातले काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. मला त्याविषयी माहिती नाही. पण इन्स्टाग्रामवर एक पोस्ट पाहिली. तेव्हा ते व्हिडिओ उघडायची किंवा बघायची माझी हिंमत झाली नाही. ज्यांना संतोष देशमुखांना जेवढ्या अमानुषपणे मारले आणि मारहाण करून व्हिडिओ केला. त्यांच्यामध्ये जेवढी निर्मनुष्यता आहे किंवा या व्हिडिओचा काही तरी वापर करायचा, असा कुणी प्रयत्न करत असेल, त्याच्यामध्ये देखील जी निर्मनुष्यता आहे, ती माझ्यामध्ये नाही. ते बघण्याची माझी हिंमत नाही, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.संतोष देशमुखांच्या हत्येनंतर मी पहिल्यांदा मुख्यमंत्र्यांना पत्र दिले होते, १२ डिसेंबरचे माझे संपूर्ण भाषण पाहा, त्यात मी व्यक्त झालेली आहे. यामध्ये कोणाचा



हात आहे, हे केवळ तपास यंत्रणेलाच माहिती आहे. त्यामध्ये कुठलाही हस्तक्षेप मी करण्याचे कारण नाही. ज्या मुलांनी ही हत्या केली, त्या मुलांमुळे समस्त राज्यातील समाज, ज्यांचा काहीही दोष नाही. तो सुद्धा मान खाली घालून गंभीरपणे वावरत आहे. खरे तर त्या समाजाची मुले आणि ज्याची इतकी निर्घृण हत्या झाली, तो समाज एका आक्रोशात वावरत आहे. समाज आणि जात याच्यावर बोलायची गरज नाही. पण आता परिस्थितीच अशी आहे. प्रत्येक गोष्ट जातीवर जाते. गुन्हेगाराला कुठलीही जात नसते. कुणाला निर्दयीपणे संपवणाऱ्याला कुठलीही जात नसते. त्याच्यावर निर्णय घेणाऱ्या राज्यकर्त्यांना सुद्धा जात नसली पाहिजे, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.जेव्हा आम्ही या खुर्चीवर बसलो, मी बसले, तेव्हा आमदारकीची एक शपथ घेतलेली आहे. कुठलाही ममत्व भाव न बाळगता, कुणा विषयीही कसला आकस किंवा द्रेष न बाळगता काम करायला पाहिजे, यावर मी ठाम आहे. संतोष देशमुखांच्या झालेल्या निर्घृण हत्येवर निषेध व्यक्त करताना मी मनापासून संतोष देशमुखांच्या आईची क्षमा मागते. कारण ज्या मुलांनी ही निर्घृण हत्या केली, ते माझ्या पोटचे असते, तरी मी हेच म्हटले असते की त्यांना कडक शासन करा. याच्यापलीकडे कोणताही राजकीय नेता एखादे व्यक्तिमत्व कोणतेही भाष्य करू शकत नाही, असे सांगताना पंकजा मुंडे भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याचे मी स्वागत करते. हा राजीनामा फार आधी व्हायला पाहिजे होता. या राजीनाम्यापेक्षा शपथच व्हायला नको होती. तर या सगळ्या गोष्टींना कदाचित सामोरे जावे लागले नसते. राजीनामा घेणाऱ्यांनी सुद्धा आधी घ्यायला पाहिजे होता. धनंजयने सुद्धा आधी द्यायला पाहिजे होता. या सगळ्या वेदनांपासून कदाचित गरिमामय त्याला मार्ग मिळाला असता. मी त्याची बहीण असले, तरी आम्ही वेगवेगळ्या पक्षात काम केले होते. पण कोणत्याही आईला, बहिणीला, परिवाराला वाटत नाही की, आपल्या परिवारातील सदस्याला या दु:खातून जावे लागेल. पण जेव्हा आपण खुर्चीवर बसून विचार करत असतो, तेव्हा आपण राज्याच्या प्रत्येकाच्या सारख्याचा विचार केला पाहिजे. त्या पोराच्या परिवाराच्या, त्याच्या जिवाच्या वेदनांपुढे धनंजय मुंडेंचा राजीनामा काहीही मोठा निर्णय नाही. धनंजय मुंडेंनी जो निर्णय घेतला, ते योग्यच केले आहे. मला वाटते देर आए दुरुस्त आए, असे मत पंकजा मुंडे यांनी व्यक्त केले.

## अखेर धनंजय मुंडे यांचा मंत्रीपदाचा राजीनामा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर अखेर राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येच्या कटात आ. धनंजय मुंडे यांचा राईट हँड समजला जाणारा वाल्मिक कराड हा मुख्य सूत्रधार असल्याचे चार्जशीट मध्ये नमूद करण्यात आले आहे. दरम्यानच्या काळात मुंडे यांच्यावर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप झाले. त्यामुळे मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी सातत्याने होत होती. सोमवारी क्रूर हत्येचे फोटो प्रसारमाध्यमातून व्हायरल झाले. मारेकऱ्यांचे क्रौर्य पाहून राज्यभरात संतापाची लाट उसळली आणि राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता निर्माण झाली. राज्यभरातील जनतेचा तीव्र रोष लक्षात घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी सायंकाळी झालेल्या एका बैठकीत मुंडे यांना आपल्या पदाचा राजीनामा देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आज धनंजय मुंडे यांनी आपल्या झ– व ओएसडींच्या मार्फत आपला राजीनामा मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द केला. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी तो तत्काळ स्वीकारला. सदरील राजीनामा पुढील कार्यवाहीसाठी राज्यपालांकडे पाठविण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.



## देविदास नारमोड शिक्षण विस्तार अधिकारी यांचा सेवापुर्ती सोहळा संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

शिक्षक विस्तार अधिकारी शिंदी तालुका उमरीचे देविदास गणपतराव नारमोड हे ४० वर्षं सेवा करून दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असून त्यांचा सेवापूर्ती समारंभ दि. १ मार्च रोजी सायंकाळी ६.००वाजता आर्य भवन धर्माबाद येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती उमरी नंदकुमार कुलकर्णी,प्रमुख पाहुणे शिक्षण विस्तार अधिक शंकरराव बेळकोने, माजी शिक्षण विस्तार अधिकारी यु.जी. देशमुख माजी शिक्षण विस्तार अधिकारी जी.पी. देशमुख, माजी शिक्षण अधिकारी के.पी सोने, विस्तार अधिकारी गिरीधारी मोळके यांच्यासह उमरी,धर्माबाद येथील केंद्रप्रमुख शिक्षक उपस्थित होते. देविदास नारमोड यांचा जन्म धर्माबाद तालुक्यातील पाटोदा खुर्द येथे ७ फेब्रुवारी १९६७ रोजी झाला, घरच्या परिस्थितीवर मात करून गावांतच ४ थी पर्यंत शिक्षण घेऊन ५–१० पर्यंत जिल्हा परिषद हायस्कूल बिलोली येथे घेतले पुढे शासकीय अध्यापक विद्यालय धर्माबाद येथे शिक्षण घेऊन वयाच्या १८ व्या वर्षी नांदेड जिल्हा परिषद अंतर्गत किनवट तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजगड येथे १८ जानेवारी १९८६ रोजी शिक्षक म्हणून रुजू झाले, त्यांनी धर्माबाद तालुक्यातील जारिकोट,सायखेड तर बिलोली तालुक्यात हज्जापुर, पुन्हा धर्माबाद तालुक्यातील आलुर व उमरी येथे शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून ४० वर्षं सेवा केली, सध्या १ मुलगा पोलिस उपनिरीक्षक तर २ मुली शिक्षीका असल्याचा अभिमान वाटतो असे मनोगतात बोलताना सांगितले. यावेळी आपलं नांदेड संपादक शिवराज पाटील गाडीवान, केसरी संपादक बाबुराव पाटील आलुरकर सतिश कोटगिरे दिगाबर जगताप , लक्ष्मण मामडे यांच्या सह अनेक शिक्षक सेवापूर्ती सोहळा श्री. देविदास गणपतराव बारमोड प्रतिष्ठित व्यक्ती यांनी आपल्या भाषणातून पुढील आयुष्याच्या मंगल कामना शुभेच्छा दिल्या. यावेळी उद्धव मामडे,मोहन बळवंते, मुधोळकर सर, रेड्डी सर,मोठा मित्र परिवार उपस्थित होता.




## उस्माननगर पोलीस व महसूल प्रशासनाची येळी रेती घाटावर पुन्हा कारवाई;तब्बल २.४८ कोटींचे साहित्य जप्त





लोकनेता न्यूज नेटवर्क

**करमाळा । बालाजी जाधव**

लोहा तालुक्यातील येळी घाटावर पून्हा एकदा पोलिस व महसूल विभागाच्या पथकाने रविवारी रात्री घाड टाकली. या कारवाईत २ लोखंडी बोट, ४ टिप्पर, २ जेसीबी, ४ हायवा असा २ कोटी ४८ लाख १३ हजाराचे साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी ८ जणांना ताब्यात घेऊन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

लोहा तालुक्यातील येळी घाटावर रविवारी रात्री पोलिस व महसूल विभागाच्या पथकाने संयुक्तरीत्या घाड टाकली. रात्री सुरू झालेली कारवाई सोमवारी पहाटेपर्यंत सुरू होती. यात २ लोखंडी बोट किंमत १०लाख रुपये, ४ टिप्पर १२ लाख, १ टाटा कंपनीची जेसीबी मशीन ५० लाखे त्याचबरोबर टाटा हिताई एक्स ७० कंपनीची जेसीबी मशीन ५० लाख, ४ हायवा अंदाजे किंमत ८० लाख असा एकूण २ कोटी ४८ लाख १३ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी राजू कोंडीबा पाकलवाड रा. वाघाळा, प्रभू माधव घसाडे रा. कौडगाव, सचिन हरिचंद्र जाधव रा. सातेगाव दत्ता

हरी लक्ष्मण कंधारे राहणार धानोरा, माघव पिराजी शिंजोरे रा. बळेगाव, श्रावण केशव शिराळे रा. बारूळ, शहाजी मोहनराव सावंत रा. हातनी, ज्ञानेश्वर दिगंबर वाघमारे रा. भायेगाव या ८ जणांला ताब्यात घेऊन गुन्हे दाखल करण्यात आले. येळी घाटावर यापूर्वी देखील घाडसी कारवाई झाली होती. सदर कारवाई अप्पर पोलिस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलिस अधिकारी अश्विनी जगताप, उपविभागीय दंडाधिकारी संगेवार, लोहा येथील तहसीलदार परळीकर उस्माननगरचे सहाय्यक पोलिस निरीक्षक पवार, गजानन गाडेकर, पोहेकॉ हंबर्डे, श्रीमंगले महसूल व उस्माननगर पोलिस ठाण्यातील कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. या कारवाईबद्दल जिल्हा पोलिस अधीक्षक अविनाश कुमार यांनी पथकास कौतुकाची थाप दिली.

## बाहेर जिल्ह्याला जात असलेले मानार धरणातील पाणी रोखण्याच्या मागणीसाठी बारूळ येथे आज जल समाधी आंदोलन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**

बारूळ येथील मानार धरणातील पाणी लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुका व इतर १२९ गावांना ग्रीड पाणीपुरवठा योजनेच्या नावाखाली पाणी नेण्याचे काम चालू असून ते काम थांबवावे या मागणीसाठी दिनांक पाच मार्च रोज बुधवारी. दुपारी दोन वाजता बारूळ येथील डॅम वर जलसमाधी आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती पाणी बचाव पाणी बढाव संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष व्यंकटराव घोरपडे यांनी दिली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, मुख्य अभियंता यांनी सखोल तांत्रिक तपासणी केल्याचे बोगस करून २२ जून २२ रोजी मान्यता दिली. मानार धरणातील जलसाठा ,मृत साठा व धरणातील गाळ व या धरणावरील तीन तालुक्यातील शेतकऱ्यांचे जीवन याचा विचार न करता मान्यता दिली. हैदराबाद येथील मोघा इंजीनियरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. या कंपनीस रुपये ६०० कोटीचे टेंडर देण्यात आले व कामही सुरू झाले. मानार धरणावरील तीन




तालुक्यातील शेतकऱ्यांचे व मच्छीमारांचे जीवन अवलंबून असून धरण उशाला कोरड घशाला या उक्तीप्रमाणे अवस्था होणार आहे त्यासाठी सदर काम रद्द करावे या मागणीसाठी जलसमाधी आंदोलनात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन पाणी बचाव पाणी बढाव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## संपादकीय..

# २७ वर्षांनतर दिल्लीत भाजपाचे सरकार

लोकनेता न्यूज नेटवर्क

दिल्लीच्या नवव्या मुख्यमंत्री म्हणून भाजपाच्या रेखा गुप्ता यांनी गुरुवारी शपथ घेतली. तब्बल २७ वर्षांनंतर दिल्लीत भाजपाचे सरकार स्थापन झाले. भाजपाच्या सुषमा स्वराज यांच्या नेतृत्वाखालील सरकार काँग्रेसने हटवले व शीला दीक्षित पंधरा वर्षे मुख्यमंत्री राहिल्या. नंतर काँग्रेसचे सरकार 'आप'ने हटवले व अरविंद केजरीवाल व शेवटचे काही महिने आतिशी मुख्यमंत्री राहिल्या. यावर्षी ८ फेब्रुवारीला दिल्ली विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला व भाजपाला निर्विवाद बहुमत प्राप्त झाले. दोन तृतियांशपेक्षा जास्त जागा भाजपाने जिंकल्या. मोदींची लोकप्रियता, करिष्मा सर्वश्रेष्ठ असल्याचे निकालाने सिद्ध केले. मोदींच्या जादूने कमाल केली आणि केंद्रात हटट्रीक संपादन करणाऱ्या भाजपाने दिल्लीतही कमळ फुलवले. देशभरात २१ राज्यांत आता भाजपा सत्तेवर आहे, हा सुद्धा मोठा विक्रम आहे.दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर सरकार स्थापन व्हायला बारा दिवस लागले. दिल्लीची सत्ता भाजपाला मिळाली पण दिल्लीचा मुख्यमंत्री कोण होणार याची संपूर्ण देशाला उत्सुकता होती. दिल्लीच्या निवडणुकीत भाजपाने मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर केला नव्हता. त्यामुळे केजरीवाल यांच्यानंतर दिल्लीचा मुख्यमंत्री कोण यावर अनेक तर्क-वितर्क प्रकट झाले. पण भाजपा श्रेष्ठींनी रेखा गुप्ता यांची या पदासाठी निवड करून आश्चर्याचा धक्का दिलाच पण पक्ष संघटना व कार्यकर्त्यांना यांना आपण महत्त्व देतो हे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी सर्व देशाला दाखवून दिले. रेखा गुप्ता दिल्लीच्या चौथ्या महिला मुख्यमंत्री आहेत. सुषमा स्वराज, शीला दीक्षित आणि आतिशी यांच्यानंतर हा मान त्यांना मिळाला आहे. सुषमा स्वराज व आतिशी यांना मुख्यंमत्रीपदावर राहण्याची संधी अल्पकाळ मिळाली होती. तर शीला दीक्षित या सलग तीन टर्म मुख्यमंत्री होत्या. रेखा गुप्ता यांची मुख्यमंत्रीपदासाठी निवड करताना पक्ष श्रेष्ठींनी निवडून आलेल्या दिग्गजांची नावे बाजूला ठेवली हेही लक्षात घेण्यासारखे आहे. रेखा गुप्ता या संघ परिवाराच्या संस्कारातूनच पुढे आल्या. विद्यार्थी असताना त्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे झोकून काम करीत असायच्या. त्यांना कोणतीही राजकीय कौटुंबिक पार्श्वभूमी नाही. राजकीय घराणेशाहीचा आरोप त्यांच्यावर चुकूनही कोणाला करता येणार नाही. सार्वजनिक जीवनात काम करणारी मध्यमवर्गीय गृहिणी म्हणजे रेखा गुप्ता हीच त्यांची दिल्लीतील प्रतिमा आहे. वाजपेयी-अडवाणींच्या काळापासून त्या पक्ष संघटनेत सक्रिय आहेत. त्यांचा राजकीय प्रवास म्हणजे पक्ष निष्ठा, इमानदारी व कार्यक्षमता सिद्ध करणारा आहे.शालिमार बाग मतदारसंघातून प्रथमच आमदार झालेल्या ५० वर्षीय रेखा गुप्ता यांचे सर्वसामान्य जनतेतूनही उत्स्फूर्त स्वागत झालेले बघायला मिळाले. विधानसभा निवडणूक काळात मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान म्हणून ओळखला जाणारा शीशमहाल खूप गाजला होता. शीशमहालच्या नूतनीकरणावर आप सरकारने ४५ कोटी खर्च केल्याचा आरोप भाजपाने केला होता. शीशमहाल हे भ्रष्टाचाराचे प्रतीक बनले होते. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर रेखा गुप्ता यांनी आपण वादग्रस्त शीशमहालमध्ये राहायला जाणार नाही असे जाहीर करून टाकले व त्याचे दिल्लीकरांनी कौतुकही केले. त्या म्हणाल्या-माझ्यावर पंतप्रधान मोदी व पक्षाच्या हायकमांडने जो विश्वास दाखवला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. मी कधीच विचार केला नव्हता की मी दिल्लीची मुख्यमंत्री होईन, पण मी त्या काचेच्या महालात राहायला जाणार नाही. रेखा गुप्ता या उच्चशिक्षित असून पेशाने वकील आहेत. एनडीएच्या त्या एकमेव महिला मुख्यमंत्री आहेत. त्यांनी कॉलेज जीवनात दिल्ली विद्यापीठ विद्यार्थी संघाचे सचिव म्हणून काम केले. भाजपा युवा मोर्चा दिल्लीच्या त्या सचिव होत्या, पीतमपुरा व शालिमार बाग प्रभागातून त्या तीन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आल्या, दिल्ली प्रदेश महिला मोर्चाच्या त्या सरचिटणीस होत्या, भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीवर सदस्य होत्या. संघटनेचा त्यांना मोठा अनुभव आहे, त्याच कामाची पावती म्हणून श्रेष्ठींनी त्यांच्यावर दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून सेवा करण्याची जबाबदारी सोपवली. शालिमार बाग मतदारसंघातून यंदा त्यांनी आप व काँग्रेस अशा दोन्ही उमेदवारांचा पराभव करून २९,५९५ मतांनी विजय मिळवला ही सुद्धा त्यांची जमेची बाजू आहे. शीला दीक्षित किंवा अरविंद केजरीवाल हे दोन्ही मुख्यमंत्री नवी दिल्ली मतदारसंघाने दिले होते. रेखा गुप्ता मात्र शालिमार बागमधून निवडून आल्या आहेत. यंदाच्या निवडणुकीत नवी दिल्ली मतदारसंघातून भाजपाचे प्रवेश वर्मा यांनी अरविंद केजरीवाल यांचा नवी दिल्ली मतदारसंघात दणदणीत पराभव केला. प्रवेश यांचे वडील साहबसिंह वर्मा हे दिल्लीचे भाजपाचे मुख्यमंत्री होते. प्रवेश यांनी केजरीवाल यांचा पराभव केल्याने त्यांना मीडियाने जायंट किलर अशी मोठी प्रसिद्धी दिली. तेच मुख्यमंत्री होतील असे अंदाजही व्यक्त झाले. खरं तर दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत पक्षाचे सहा दिग्गज नेते होते. पण मोदी-शहांनी रेखा गुप्ता या प्रसिद्धीपासून दूर असलेल्या महिला कार्यकर्तीची निवड केली व भाजपा महिला सक्षमीकरणाला कसे प्राधान्य देते हा त्यातून संदेश दिला. दिल्लीच्या ऐतिहासिक रामलीला मैदानावर झालेल्या शानदार शपथविधी सोहळ्यास स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच देशातील भाजपाचे मुख्यमंत्री आणि एनडीएचे उपमुख्यमंत्री आवर्जून हजर होते. भाजपाचे सरकार दिल्लीत स्थापन झाले तरी आम्ही एनडीएला बरोबर घेऊन कारभार चालवत आहोत, असा विश्वास भाजपाने सर्व मित्रपक्षांना दिला आहे. दिल्लीकर जनतेने भाजपाला प्रचंड बहुमत देऊन दिल्लीची सत्ता दिली आहे म्हणूनच दिल्लीकरांच्या अपेक्षाही उंचावल्या आहेत.






दैनिक लोकनेता चे सल्लागार मार्गदर्शक गुरुवर्य ड. डॉ. विजयकुमार कस्तुरे यांची चिखली येथे भेट घेऊन त्यांना शुभेच्छा देतांना दैनिक लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवत, जेष्ठ पत्रकार महेश वाधवाणी, पी. के. इन्स्टिटयूट चे संचालक प्रदीप कुटे, दैनिक लोकनेता चे सहसंपादक ऋषिकेश जायभाये, रवी जायभाये, आदी मान्यवर उपस्थित होते. (छाया :- लोकनेता न्युज नेटवर्क चिखली)

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अवकाशात

लोकनेता न्यूज नेटवर्क

कृत्रिम बुद्धीमत्तेच्या अवकाशात अमेरिका आणि चीनसारखे तगडे देश आधीपासूनच स्थान राखून असताना पुढील सहा महिन्यांमध्ये भारतही त्यात प्रवेश करत असल्याची बातमी महत्त्वपूर्ण म्हणायला हवी. येणारे युग कृत्रिम बुद्धीमत्तेचे असल्याचे एव्हाना सिद्ध झाले आहे. त्यामुळेच भारत उपलब्ध यंत्रणेच्या पायावर या अवकाशातील आपले इमले रचतो की नव्याने पायाभरणी करतो, हे बघावे लागेल. अमेरिका आणि चीनपाठोपाठ आता भारतही एआयच्या क्षेत्रामध्ये पाऊल ठेवत असल्याची बातमी अनेकार्थाने महत्त्वपूर्ण म्हणावी लागेल. विशेषत: जगभर 'डिपसीक'चा बोलबाला असताना भारतीयांनी या बदलाचे महत्त्व आणि होणारे परिणाम जाणून घेणे गरजेचे आहे. अर्थातच त्यासाठी पार्श्वभूमी जाणून घेणे गरजेचे आहे. गेल्या काही वर्षांमध्ये एआय अर्थात कृत्रीम बुद्धिमत्ता हा घटक सर्वसामान्यांच्या आयुष्याशी जोडला गेला आहे. तो त्यांची अनेक कामे सोपी, सुलभ करत असल्याने याची उपयुक्तता आणि आवश्यकता सर्वसामान्यांना समजली आहे. दुसरीकडे, याविषयीची भीतीही बघायला मिळते. अनेकांचे रोजगार जातील का, हा प्रश्नही वारंवार विचारला जातो. मात्र या भीतीपोटी आता चॅटजीपीटीचा वापर थांबणे शक्य नाही. याद्वारे आपल्याला अत्यंत समर्पक उत्तरे मिळतात. केवळ माहितीच नव्हे तर जोडीला व्हीडिओ, ऑडिओ, प्रतिमा हे सगळेही मिळते. चॅटजीपीटीच्या या तंत्रज्ञानामागे लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) नामक तंत्रज्ञान वापरले जाते. यातील तांत्रिकतेकडे न बघता अगदी सोप्या भाषेत सांगायचे, तर गुगलचे सर्च इंजिन आणि चॅटजीपीटी यातील फरक लक्षात घेता समजते की, सर्च इंजिनवर आपण आवश्यक ती माहिती पुरवण्याची मागणी नमूद करतो आणि त्यानुसार ते संबंधित माहिती पुरवते. मात्र चॅटजीपीटी वापरत असणाऱ्या एलएलएमकडून मिळालेल्या माहितीचे स्वरूप शब्द पुरवलेल्या मजकुराचे नसते, तर माणसाची नैसर्गिक भाषा अर्थात नॅचरल लँग्वेज प्रोसेसग समजून घेण्याची क्षमता या अत्याधुनिक तंत्रज्ञानात असते. म्हणजेच एखाद्या माणसाला समजतो तसा त्याला विचारलेला प्रश्न समजतो आणि तो समजून माणूस उत्तर देईल, तशा प्रकारे आपल्याजवळ असणाऱ्या माहितीच्या ढिगाऱ्यातून बिनचूक माहिती तो समोर मांडतो. एलएलएमला हे महत्त्व असल्यामुळे तंत्रज्ञानातील नवीन टप्पा अर्थात जनरेटिव्ह एआय असे म्हणतात.नवनिर्मिती करण्याची क्षमता त्याला वेगळे महत्त्व देऊन जाते. थोडक्यात, आपण याला अल्लाउद्दिनचा जादूचा दिवा म्हणू शकतो. असे हे ओपन एआयचे तंत्रज्ञान जगासमोर आणल्यानंतर लोक अक्षरश: चाट पडले होते, कारण आपल्यासमोर असे काही येईल, याची कल्पनाही त्यांनी केली नव्हती. पुढे याच धर्तीवर अल्फाबेट कंपनीचे जेमिनी, फेसबुकच्या मेटा कंपनीचे लामा असे तंत्रज्ञान समोर आले. त्यामुळे या क्षेत्रावर अमेरिकेचे मक्तेदार असल्याचे चित्रही स्पष्ट झाले. ते खरेही होते. या तंत्रज्ञानासाठी





माहितीचे मोठमोठे ढीग उपसावे लागतात. त्यासाठी संगणकाची प्रचंड मोठी क्षमता वापरावी लागते. सर्वसामान्यपणे संगणकाचे काम चालवण्यासाठी सेंट्रल प्रोसेसग युनिटचा वापर होतो. तो संगणकाचा मेंदू असतो. मात्र एआयमध्ये हा मेंदू पुरेसा ठरत नाही. म्हणूनच त्यासाठी विशिष्ट प्रकारची चीप वापरली जाते. त्याला ग्राफिकल प्रोसेसग युनिट (जीपीयू) असे म्हणतात. हे जीपीयू तयार करणारी अमेरिकेतील 'एनव्हिडिया' ही कंपनी असून तिची या कामात मक्तेदारी आहे. या चीपच्या बळावर सगळी कामे वेगाने केली जातात आणि म्हणूनच हे काम फक्त अमेरिकेतच होऊ शकते, असे समजले जात होते.एआयमधील आपली एकाधिकारशाही टिकवण्यासाठी काही दिवसांपूर्वी अमेरिकेने या चीप्सच्या निर्मितीवर मर्यादा घातल्या होत्या आणि चीनला चीप्सची आयात करता येऊ नये, अशा प्रकारचे नियमही आणले होते. मात्र हे सगळे अडथळे पार करून त्यांच्या 'डिपसीक' या कंपनीने एका वर्षांच्या आत ओपनएआय, जेमिनी, लामा या सगळ्यांसारखे एलएलएम अत्यल्प खर्चामध्ये उभे करून दाखवले. त्याची क्षमता ओपनएआय वा वर उल्लेख केलेल्या कंपन्यांसारखीच आहे. त्यामुळेच चीनकडून पुढे आणल्या गेलेल्या या तंत्रज्ञानाने जगाला मोठा धक्का बसला. याचे जागतिक परिणामही बघायला मिळाले. अगदी सर्वसामान्य लोकही याचा विनामूल्य वापर करु शकणार असल्याने स्पर्धेला तोंड फुटल्याची भीती व्यक्त केली गेली. कंपन्यांना ओपनएआयचा व्यावसायिक वापर करायचा असेल, तर पैसे भरावे लागतात. मेटाचे 'लामा' हे सॉफ्टवेअर मात्र फुकट आहे. त्याला ओपन सोर्स म्हटले जाते. आता डिपसीक कंपनीचे बाजारात आलेले एलएलएमही ओपन सोर्स असणे हादेखील एक मोठा आणि महत्त्वाचा घटक समजला गेला. त्यामुळेच चॅटजीपीटी वा जेमिनी या कंपन्यांना सॉफ्टवेअरमधून मिळणाऱ्या निधीला धोका पोहोचण्याची भीती वाढली आणि जागतिक पातळीवर त्याचे आर्थिक पडसाद बघायला मिळाले. या सगळ्या पार्श्वभूमीवर सध्याच्या चर्चेप्रमाणे लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) ची निर्मिती भारत नव्याने करणार आहे की त्यासाठी सध्या उपलब्ध असणारे तंत्रज्ञानच वापरणार, याची स्पष्टता अद्याप आलेली नाही. आहे ते तंत्रज्ञान वापरून भारत या क्षेत्रात उतरणार असेल तर हे इतके मोठे काम वा महत्त्वपूर्ण बाब वाटणार नाही. मात्र भारत नव्याने हे तंत्रज्ञान विकसित करणार असेल आणि भारताशी संबंधित असणाऱ्या गोष्टींसाठी त्याचा उपयोग होणार असेल तर निश्चितच त्याला खूप जास्त महत्त्व आहे. याकडे दोन अंगांनी बघावे लागेल.एक म्हणजे याद्वारे भारताशी संबंधित अचूक माहिती मिळेल. जागतिक पातळीवरील लार्ज लँग्वेज मॉडेलमध्ये आपल्या देशातील वेगवेगळ्या प्रकारचे तपशील तितक्याशा मोठ्या प्रमाणात येत नाहीत. तुलना करायची झाल्यास जगाचा ज्ञानकोश आणि भारताचा ज्ञानकोश यात दिसते तसेच अंतर बघायला मिळेल. पण भारत आपल्यासाठी एआय च्या तंत्रज्ञानाची निर्मिती करेल तेव्हा भारताशी संबंधित सर्व छोटे-मोठे तपशील येऊ शकतील. अर्थातच ते स्थानिक व्यापार-उदिमसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. अगदी साधे उदाहरण घ्यायचे तर भारतातील कला, संस्कृती, इतिहास अशा बाबींची माहिती तिथे असेल तर सर्व प्रकारचे व्यवसाय, धंदे त्या आनुषंगाने आपला व्यवसाय पुढे नेऊ शकतात. त्या दृष्टीने सॉफ्टवेअर निर्माण करणे वा अशी कामे ते करु शकतात. भारतात येऊ पाहणाऱ्या विदेशी पर्यटकांनी या चॅटजीपीटीला भारताशी संबंधित प्रश्न विचारले, तर अधिक अचूक आणि परिपूर्ण माहिती मिळू शकते. या माध्यमातून ते हवा तेवढा तपशील मिळवू शकतात.लार्ज लँग्वेज मॉडेलमध्ये माहितीचे साठे खूप मोठ्या प्रमाणावर असतात. पण याच्या जोडीला भारतात स्मॉल लँग्वेज मॉडेल्सही तयार होऊ शकतात. ती त्या त्या व्यवसायासाठी, राज्यासाठी वा अगदी गावासाठीही कामी येऊ शकतात, कारण विविध पातळ्यांवर बनवता येऊ शकतात. याला आपण फोकस लँग्वेज मॉडेलही म्हणू शकतो. पण त्याचबरोबर इथे केवळ फोकस माहितीच नव्हे तर, अन्य प्रकारेही कृत्रीम बुद्धिमत्ता मदत करु शकते. जसे की, हे तंत्रज्ञान विशेष मुलांसाठी कशा प्रकारची चित्रे आणि व्हीडिओ असू शकतात, हे बघून त्यानुसार संशोधन समोर मांडेल. थोडक्यात, अशा प्रकारचे अनेक प्रयोग करण्यास मोठा वाव आहे. स्थानिक पातळीपासून देशाच्या पातळीपर्यंत ते राबवता येऊ शकतात. पण त्यासाठी प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. आवश्यक तेवढा निधी आला पाहिजे. विशेष म्हणजे अगदी छोट्या छोट्या गोष्टींसाठी याचा वापर करुन घेता येतो, यासंबंधीची जाण लोकांमध्ये आली पाहिजे. अशा अंगांनी वापरल्यास हे तंत्रज्ञान लक्षणीय बदल घडवून आणू शकेल. एकदा हे साधले की जागतिक पातळीवरील व्यापारवृद्धीच्या संधी खुल्या होण्यास फारसा वेळ लागणार नाही.

# प्रयत्नामध्ये सातत्य हवे

लोकनेता न्यूज नेटवर्क

जीवनामध्ये यशवंत होण्यासाठी प्रयत्न आणि सातत्य या दोन बाबी अतिशय महत्त्वाच्या असतात. आपल्या प्रयत्नामध्ये सातत्य असल्यास आपले ध्येय सहज पार पाडू शकतो. तेव्हा आपल्या प्रयत्नाला यश मिळाल्यामुळे स्वत:ला शिस्त आणि परिश्रम घेण्याची जिद्द निर्माण होऊन यातून काम करण्याची शक्ती मिळते. विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेत यश संपादन करण्यासाठी आपल्या प्रयत्नात सातत्य टिकून ठेवायला हवे. त्यासाठी नियमित अभ्यास व आपल्याला समजले नसल्यास शिक्षकांकडून समजून घेऊन प्रयत्न करायला पाहिजे. तसेच प्रयत्नात प्रामाणिकपणे सातत्य असायला हवे म्हणजे यशाच्या मार्गात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होत नाही. त्यासाठी खूप परिश्रम घ्यावे लागतात. याची जाणीव विद्यार्थ्यांना होण्यासाठी थोडक्यात घेतलेला वेध

आपल्याला कोणत्याही क्षेत्रात यश मिळविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करावे लागतील. त्या प्रयत्नात सातत्य असले पाहिजे. यासाठी विशिष्ट कालावधी गृहीत धरावा लागतो. विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष असते त्या शैक्षणिक वर्षात एकूण विषय व प्रत्येक दिवशी अभ्यास करण्यासाठी दिला जाणारा वेळ आणि त्यावेळेत त्या विषयाचा केलेला अभ्यास. असा नियमित अभ्यास करायला हवा. केवळ विद्यार्थ्यांनी एक दिवस प्रयत्न करून चालणार नाही तर त्या प्रयत्नात सातत्य असायला हवे. ते सुद्धा दर दिवशी तरच आपण शैक्षणिक क्षेत्रात घवघवीत यश मिळवू शकतो. त्यासाठी प्रत्येक विषयातील संकल्पना नीट समजून घेणे आवश्यक आहे. मनाची जिद्द, एकाग्रता व आवड निर्माण करायला हवी. विद्यार्थ्यांनी अभ्यास करताना आळसाने अभ्यास करू नये. कारण आळस हा माणसाचा सर्वात मोठा क्षत्रू आहे. तेव्हा आपल्या आवडीच्या क्षेत्रात यश साकारण्यासाठी आळस बाजूला



सारून वेळेला महत्त्व द्यावे. जीवनात वेळ महत्त्वाची असते. त्यात दिलेल्या वेळेत सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास उत्तम कामगिरी आपल्या क्षेत्रात करू शकतो. तेव्हा प्रत्येकाच्या जीवनात यशाचा मार्ग म्हणजे प्रयत्न आणि सातत्य होय. या यशाच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रयत्न आणि सातत्य अतिशय महत्त्वाचे असते.

विद्यार्थ्यांनी यश मिळविण्यासाठी अपयशावर मात केली पाहिजे. त्यासाठी अपयश पचविण्यासाठी मनाचा मोठेपणा असावा लागतो. पाहा ना! मागील आठवड्यात एका कॅन्टीनमध्ये महाविद्यालयातील शिक्षण घेणारी विद्यार्थिनी गेली ती सुद्धा कॅन्टीनच्या किचन रूममध्ये आणि काहीच बोलत नव्हती. काही वेळाने तिने हातात लाईटर घेऊन शेगडी पेटविण्याचा प्रयत्न केला. नंतर ऑईल दे दो ऑईल दे दो अशी म्हणायला लागली. हा प्रकार समजता तिला किचन रूममधून बाहेर आणण्यात आले. त्यानंतर ती मोठमोठ्याने रडू लागली. नंतर सर्वांच्या लक्षात आले की, ती मुलगी नापास झाल्याने अशा मार्गाचा ती अवलंब करीत होती. तेव्हा संशोधकांनी अशा विषयांवर संशोधन करणे गरजेचे आहे. एखाद्या परीक्षेत सर्वच विद्यार्थी पास होतात असे नाही; परंतु या मुलीला केवळ नापास झाल्याने कॅन्टीनच्या किचनमध्ये जाऊन आता आपण पास होणारच नाही या भीतीने शेवटचे पाहूल उचलत होती. तसेच बोर्डाच्या बारावीच्या पहिल्या पेपरला पुण्यातील एका विद्यार्थ्यांने प्रश्नपत्रिका हातात आल्यानंतर पहिल्या मजल्यावरून खाली उडी मारली. तेव्हा अशी वेळ विद्यार्थ्यांवर का आली? याचा विचार होणे आवश्यक आहे.

अपयश ही यशाची पहिली पायरी असते असे म्हटले जाते. मात्र प्रयत्नामध्ये सातत्य असेल तर नक्कीच आपल्याला यश संपादन करता येईल. तेव्हा कोणतेही यश संपादन करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतील. जीवनात यशाच्या उंच शिखरावर जायचे असेल तर प्रयत्न अतिशय महत्त्वाचा असतो. त्या प्रयत्नामध्ये सातत्य महत्त्वाचे असते. हे आजच्या विद्यार्थ्यांनी लक्षात घेतले पाहिजे. परीक्षा आली की, परीक्षेच्या आदल्या दिवशी मित्राला मोबाईलवरून फोन करायचा. त्यावर पहाटेपर्यंत विषयाच्या परीक्षेच्या दृष्टीने चर्चा करायची. मग दुसऱ्या दिवशी तीन तास पेपर कसा लिहिणार? खरंच सांगा एका रात्रीत अभ्यास होईल का? मग परीक्षेच्या काही तास आई-वडिलांना सांगायचे माझे डोके दुखते, अंग थरथरते, मला काहीच अभ्यासाचे सुचत नाही, मी आता परीक्षेला जात नाही? असे अनेक प्रश्न परीक्षेच्या दिवशी विद्यार्थ्यांसमोर निर्माण होतात. म्हणून अभ्यासक्रम निवडल्यानंतर आणि अभ्यासक्रमाला सुरुवात झाल्यावर नियमित अभ्यास करावा. समजा एखादी मूळ संकल्पना समजली नसेल, तर अध्यापकांकडून इतर वेळेत समजून घ्यावी.यातच विद्यार्थ्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. आपली प्रगती करून घेण्यासाठी सातत्य महत्त्वाचे असते. यातून यश साध्य झाल्यावर अधिक उत्साह वाढतो. यासाठी आवड असणे जरूरीचे असते. मुळात एखाद्या विषयाची आवडच नसेल तर प्रयत्नात सातत्य कसे निर्माण होणार. हा खरा प्रश्न आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्राकडे वळावे. जर आवडीच्या क्षेत्रात प्रवेश मिळाला नाही तर ज्या क्षेत्रात प्रवेश मिळणार असेल तो समजून घेता आला पाहिजे. त्यासाठी प्रयत्नात सातत्य टिकवता आले पाहिजे. तेव्हा प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रयत्न आणि सातत्य या दोन गोष्टींचा योग्यप्रकारे वापर केल्यास आयुष्यात अशक्य असे काहीच नसते. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नामध्ये सातत्य हवे.

# भारतीय लहुजी सेनेचे सरसेनापती व्ही जी रेड्डी काळाच्या पडद्याआड,आज टाकळी येथे अंत्यविधी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

भारतीय लहुजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष व्हि. जी.रेड्डी यांचे प्रदिर्घ आजाराने नांदेड येथील विनायक हॉस्पीटलमध्ये रविवारी संध्याकाळी शेवटचा श्वास घेतला आहे.१९९० च्या दशकामध्ये भारतीय लहुजी सेनेची स्थापना करून सर्वप्रथम त्यांनी देशपिता क्रांतीपिता लहुजी साळवे, यांच्या नावाने सामाजिक संघटना काढून मातंग समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचारा विरोधात सामाजिक लढा देत सामाजिक स्तरावर व राजकीय घडामोडीवर लक्ष देवून मातंग समाज देखील समाजकारण, राजकारण, अर्थकारण यामध्ये पुढे येवून आपली स्वतंत्र्य ओळख निर्माण व्हावी, मातंग समाजावर होणारे सुडाचे अन्याय अत्याचार यापासून सुरक्षा व्हावी समाज शोषणमुक्त,भयमुक्त व्हावे यासाठी माझा मातंग समाज हा येणाऱ्या काळात सर्वच कारणाने विकसीत व्हावा यासाठी प्रामुख्याने समाजाचं संघटन वाढवूण समाजाला आपल्या हक्क व अधिकार याबाबद मातंग समाजाचा शुरविरांचा इतिहास समाजाचा प्रतिबींब यांनी जाणून सतत मार्गदर्शन करत समाजाला जागृत करून शासन व प्रशासनास वेळोवेळी समाजाच्या विरोधात जेव्हा जेव्हा षडयंत्र तयार करून समाजाला बळीचा बकरा बनवण्यात आलं तेव्हा तेव्हा स्वाभिमानी,विचारधारा समाजाभिमुखी समर्पित भावनेने अन्याय अत्याचारा विरोधात प्रखड भुमीका मांडत समाजाला शोषणमुक्त, करण्यासाठी अन्यायाविरोधात लढा उभारण्या साठी समाजातील हजारो कार्यकर्ते निर्माण करून पहिल्यांदा जय लहुजी हा नारा घराघरात पोहचवून मातंग समाजाला जागृत करून अन्याया विरोधात बंड कसा करावा,त्यांच्या विरोधात पेटून उठण्यासाठी त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर मोर्चा, निषेध मोर्चेअंदोलने, वेळोवेळी शासन व प्रशासना विरोधात दंड थोपटवून बंड करणारे व्यक्तिमत्व होते व हे



संपूर्ण महाराष्ट्राला परिचित असणारं जहालमतवादी, वजनदार सामाजिक चळवळीचा मसिहा त्यांच्या नेतृत्वामध्ये महाराष्ट्राच्या मातंग समाजाच्या चळवळीतील हजारो कार्यकर्त निर्माण होवून महाराष्ट्रामध्ये सामाजिक चळवळ अधिक तिव्र गतीमान होवून क्रांतीचा अंगारा पेठविण्याची सुरुवात हि रेड्डी साहेबांनी केली त्यांचे सामाजिक त्यांच्या विचाराचं जहालमतवादी वैचारिक जाज्वलं,करारीबाणा, स्वाभिमानी, निडर, सामाजिक चळवळीला उर्जा देणारा नेता म्हणून रेड्डी साहेब यांचे योगदान महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीच्या इतिहासात सुवर्ण अक्षराने नोंदवले जाईल. कारण महाराष्ट्राच्या चळवळीचं केंद्रबिंदु असणारा महान सामाजिक चळवळीचा जाणता प्रणेता होता. त्यांनी हयातीमध्ये अनेक मोठ मोठ्या सभेतील त्यांचे सिंहासारखे गर्जना करणारे डरकाळी फोडणारे उमदे विचार आजही कानावर पडले की समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या शरीरातल रक्त हे क्रांतीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी सळसळतं जाग होतं अशी त्यांची जहालमतवादी असणारी भुमीका अत्यंत जाणवत राहणारी आहे. असा समाजाचा नेता समाजाचा ढाण्या वाघ,मातंग समाजाची धडधडणारी संघर्षाची तोफ आज शांत झाली. असली तरी त्यांचे विचार त्यांची चळवळ ही जिवंत राहणारी आहे. ज्यांच्या जाण्याने मातंग समाजात सर्वत्र शोककळा पसरलेली आहे. कारण ते मातंग समाजाच्या सामाजिक चळवळीचे उमदे, सच्चे कडवे कट्टर लहुजीचे रक्त समाजमनामध्ये रक्त पेटविणारे तुफानी भाषणे, महाराष्ट्राच्या सर्व कानाकोपऱ्यात सर्वदुर प्रवास करून सामाजिक लढा अधिक तिव्र गतिमान व्हावा या उद्देशाने समाजाचे सच्चे निर्भिड, लढवय्ये कट्टर लहुसैनीकांची तोफ विचार सरणीचे संबंध महाराष्ट्रामध्ये लाखो सैनिक तयार होवून समाजिक चळवळ आज जिवंत आहे. याच श्रेय व्हि. जी. रेड्डी साहेब यांनाच जात. अशा या महान क्रांतीकारक नेत्यास अखेरचा जय लहुजी करण्यासाठी दि. ५ मार्च २०२५ रोज बुधवार दुपारी २ वाजता त्यांच्या जन्मगावी मौजे टाकळी(बु)ता. नायगाव जि.नांदेड येथे अत्यंविधी होणार आहे.तरी साहेबांचे अंतीम दर्शन घेण्यासाठी तमाम महाराष्ट्रातील लहुसैनीकांनी व तसेच समाजातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील समविचारी संघटनेतील, भारतीय लहुजी सेनेतील सर्व पदाधिकारी उपस्थीत राहण्याचे अवाहान भारतीय लहुजी सेनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष रणजीतदादा बारहाळीकर,कायदे विषयक सल्लागार ड. लक्ष्मीकांत दुधकवडे,प्रा.इरवंत सुर्यकार यांनी केले आहे.

# अतिवृष्टीचे अनुदान पाहिजे तर ई–केवायसी करून घ्यावी–रामेश्वर गोरे

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी ७१ कोटी २६ लाख ६७ हजार २०० रुपये अनुदान प्राप्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांचे माहे जून ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचे नुकसान झाले होते,त्या अनुषंगाने शासन निर्णय १० डिसेंबर २०२४ अन्वये शासनाकडून अनुदान ७१ कोटी २६ लाख ६७ हजार २०० रुपये अनुदान प्राप्त झाले आहे.त्या बाधित शेतकऱ्यांच्या याद्या शासनाच्या



ई पंचनामा पोर्टलवर ऑनलाइन अपलोड करण्यात आलेल्या आहेत. ज्या शेतकऱ्यांना व्हि.के.नंबर प्राप्त झाला आहे,त्या शेतकऱ्यांनी तात्काळ जवळच्या ई सेतू सुविधा केंद्र।शासन मान्यता प्राप्त सीएससी केंद्रावर जाऊन ई केवायसी करून घ्यावी,असे आवाहन तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी केले आहे.

ज्या शेतकऱ्यांची ई केवायसी झालेली आहे, त्यांना तहसील कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही.त्या शेतकऱ्याच्या खात्यात अनुदानाची रक्कम शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाकडून जमा करण्यात येत आहे. त्याचबरोबर नागरिकांना शेतकऱ्यांचे ई–केवायसी झाली आहे, अशा शेतकऱ्यांनी सध्यास्थिती तपासणी करण्यासाठी https: //mh.disaster management.mahait.org /PaymentStatus ही ऑनलाईन लिंक करून खात्री करणे.

त्याचबरोबर एखाद्या शेतकऱ्याचे सामायिक क्षेत्र असेल, त्या शेतकऱ्यांनी ज्यांचे नावे अनुदान रक्कम जमा करावयाचे आहे. त्यांचे बँक खाते क्रमांक, आधार व १०० रुपयाच्या बंध पत्रावर सहमती पत्र संबंधित तलाठी यांच्याकडे दाखल करावे, ज्यांचे नावे सहमती पत्र दिले आहे, त्यांनी नजीकच्या ई सेतू सुविधा केंद्र।शासन मान्यता प्राप्त सीएससी केंद्रावर जाऊन तक्रारी ई केवायसी करून घ्यावी,जर एखाद्या शेतकऱ्यांच्या नावे अनुदान आलेले आहे, परंतु सदरील शेतकरी हा मयत आहे. अशा शेतकऱ्यांच्या बाबतीत त्यांनी ग्रामपंचायतीचे वारसा प्रमाणपत्र तसेच मृत्यू दाखला, आधार कार्ड, वारसाचे बँक खाते, आधार कार्ड, सातबारा, होल्डिंग तसेच आवश्यक ती कागदपत्रे घेऊन नजीकच्या ई सेतू सुविधा केंद्र।शासन मान्यता प्राप्त सीएससी केंद्रावर जाऊन तात्काळ ई केवायसी करून घ्यावी, ई केवायसी केले बाबत पोहोच पावती घ्यावी,असे आवाहन तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी केले आहे.

# सेवानिवृत्त जवान मेजर विजय कदम यांचा गोळेगाव पशुवैद्यकीय दवाखान्यात डॉ.रविंद्र राजगुरू यांच्या हस्ते सत्कार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

उमरी गोळेगाव नगरीचे भूमिपुत्र विजय हाणमंतराव कदम यांनी भारतीय सैन्य दलात १७ वर्षे सेवा पुर्ण करून जन्मभूमीत आपल्या गोळेगाव गावी परतल्यानंतर तेथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील सहाय्यक पशुधन अधिकारी डॉ. रविंद्र राजगुरू यांनी सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला होता. सेवानिवृत्त सैनिकाप्रती आणि भारतीय सैन्यात आपली सेवा देणाऱ्या तमाम सैनिकांप्रती आपली कृतज्ञता व्यक्त व्हावी म्हणून मेजर विजय कदम यांचा यथोचित शाल श्रीफळ देवून सत्कार डॉ. राजगुरू व त्यांचे सहकारी यांनी केला व त्यांच्या हस्ते दवाखाना परिसरात मेजर कदम व त्यांच्या पत्नी सौ अश्विनी कदम यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे नियोजन आकाश बामणे यांनी केले तर सहकार्य राजू ठाकरे यांनी केले. यावेळी उपस्थित चेअरमन रामचंद्र पाटील, दत्ता वराडे(पोलिस पाटील) , मारोती पाटील, हणमंत सर्जे, रमेश सावंत, नारायण करपे, प्रकाश पुणेबाईनवाड ,योगेश जाधव , चांद शेख, बाबाराव बोबडे, शिवा चिंतलवाड, मनोज मठपती आदि जनाची उपस्थिती हो

# दत्ता तुमवाड याना संविधान भूषण पुरस्कार प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । संदिप वडजे**

पी. एफ. सी. काळू तांडा मुखेडं या एन.जी.ओ.चे संस्थापक आणि सत्यशोधक समाज प्रतिष्ठान नांदेड जिल्हा शाखा चे अध्यक्ष मां.दत्ता तुमवाड यांना दिनांक ३ मार्च २०२५ रोजी कुसुम सभागृह नांदेड येथे संविधान अमृत महोत्सव कार्यक्रमात न्यायमूर्ती बी.जे.कोळसे पाटील आणि खासदार प्रा.रवींद्र चव्हाण यांच्या शुभ हस्ते बुद्धिस्ट रिसर्च फाउंडेशन च्या वतीने संविधान भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.त्याबद्दल राजकीय व सामाजिक क्षेत्रांतील त्यांचे सर्व चाहते व मित्रमंडळी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.




# धक्कादायक संतापजनक निराशाजनक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव। संदीप कदम**

हे सर्व फोटो आणि माहिती ३ महिन्यापासून गृहमंत्र्यांकडे नव्हती ?? मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री कडे नव्हती?? आज प्रसार माध्यमांनी फोटो ंळीरश्र केल्यावर महाराष्ट्र सुन्न झालाय महाराष्ट्र उद्विग्न झालाय..
पन मग ह्या मुख्यमंत्री वाट कशाची पाहत होते? काल सुद्धा बोलले नाही? गृहमंत्री कडे सर्व पुरावे होते मग घोंगडे कुठ भिजत पडले होते ??? किती संतापजनक आहे. किती चीड आणणारे आहे लाजिरवाणे आहे? आज मुंडे ना राजीनामा देण्याच्या सूचना जरी दिला पन त्याला आता अर्थ उरला नाही. तुमची नीतिमत्ता उघडी पडली .३ महिने महाराष्ट्र टाहो फोडत होता पन तुम्ही कान बंद करून बसलात



आणि आज दबाव वाढला म्हणून तुम्ही स्वताची डाग पुसण्या साठी म्हणून दबावाने निर्णय घेताय हे चीड आणणारे आहे. तुम्ही खरे तर बडतर्फ करायला हवे होते तुमच्या अधिकारात होते पन तुमची ती संवेदनशील ता दिसली नाही. आणि तुमची प्रतिमा डागाळली. महाराष्ट्राला रोष दाखवावा लागला . पाशवी मेजॉरीटी च्या जोरावर तुम्ही काहीही कसेही वागू शकता हे महाराष्ट्राने पहिल . सत्तेचा गैरवापर खुर्ची साठी ईतके घाणेरडे राजकारण महाराष्ट्राने कधी पाहिले नाही. स्व. संतोष देशमुख कुटुंब ला तुम्ही न्याय नाही देऊ शकलात ना बीडच्या जनतेला. पाठ राखण केली तुम्ही आरोपी ची . एरवी आरडा ओरड करणार्या तुमच्या चित्रा वाघ तोंडात मुग गिळून बसल्या आणि महिला आयोग डोळ्याला पट्टी बांधुन. आरे काय चाललंय हे?? एवढी निर्लज्ज निगरगट्ट कशी झालीत राजकारणी? तुमच्या कडून खूप अपेक्षा होत्या.. अजूनही तुम्ही निराश करणार नाही ही माफक अपेक्षा. नुसता राजीनामे नाहीतर सहआरोपी करा शिक्षा करा. बाप तो बाप रहेगा हे आरोपींना तुम्ही दाखवून द्या. ह्या शैतान लोकांना १०० वर्ष विसर पडणार नाही अशी शिक्षा करा. नाहीतर महाराष्ट्र माफ करणार नाही.

# नांदेड दक्षिणचे लोकप्रिय आ.आनंदराव पाटील बोंढारकर नेहमी जनसेवेत तत्पर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**

नांदेड दक्षिण विधानसभेचे विधानसभा सदस्य आमदार आनंदराव पाटील बोढांरकर साहेब मोटारसायकल वरून सकाळी सकाळी गोबिंदबाग येथे सकाळी पायी चालणाऱ्या नागरिकां सोबत आपुलकीने चौकशी करून भौतिक सुविधा काही कमी असतील त्या पुर्ण करण्यासाठी मोटारसायकल वरून सकाळी सकाळी फिरून सुख दुःख विचारतात.आता पर्यंत असा एक ही आमदार जो मोटारसायकल वरून सकाळी सकाळी लोकांना भेटायला आलेला कधी ऐकले नव्हते. पाहीले नव्हते आमदार साहेब मोटारसायकल वरून आल्याने त्यांना खराब रस्त्याचा अनुभव निश्चितच आला असावा.यांच्या व्यतिरिक्त बोढांरकर साहेब आमदार बनल्या बनल्या दक्षिण नांदेड विधानसभेत तसेच मंत्री महोदयांना भेटून नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी नेहमी प्रयत्न केलेले नागरिकांनाही विसरता कामा नये. ह्याच्या सोबत सोबत नांदेड वाघाळा



महानगरपालिका अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन त्यांना नागरीकांना योग्य मुलभूत सुविधा देण्याच्या सूचना दिल्याचे ही निर्दशनास आलेले आहे. यामुळे नागरीकांच्या मनात हा आमदार जनतेच्या भल्यासाठी काही काम करेल ही भावना निश्चितच वाढलेली आहे. आमदार साहेबांनी नांदेड दक्षिण मतदारसंघाचा इतिहास लक्षात ठेवणे ही जरूरीचे आहे कारण दक्षिण मतदारसंघात आज पर्यंत जनतेनी कोणत्याही नेत्याला दुसऱ्यांदा संधी दिली नसल्याचे इतिहास पाहायला मिळतो आनंदराव पाटील साहेब ही प्रथा मोडून काढतील की नाही हे भविष्यात कळेल.आमदार साहेब गुरूद्वारा आजुबाजूच्या परिसरात, अबचलनगर मधील सर्व भागात रात्रीच्या वेळी भेट देवून नागरीकांच्या समस्या जाणून घ्याव्यात.या दरम्यान आपल्याला लाईट, रस्ते, साफसफाई बद्दल एखाद्या अविकसित खेड्याचा अनुभव आल्याशिवाय राहणार नाही.आणखी एक विशेष मागणी संत बाबा निधान सिंघ जी चौरस्ताच्या वर पादचारी पूलाची फारच दुरावस्था झालेली आहे खुप मोठ मोठाले छिद्र पडलेले आहेत.तसेच या पुलाला हटविण्याची मंजुरी मिळूनही दोन तीन वर्षे होत आहेत सातत्याने शिख समाजाच्या वतीने या बाबतीत सार्वजनिक बांधकाम विभागाला पाठपुरावा केल्यानंतर ही काही कार्यवाही होत नाही तरी होळीच्या सणाला येणारे यात्रेकरू या पुलावर चढून उभे राहतात कधी काही पुल तुटून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी या पुलासाठी आपण काळजीपूर्वक लक्ष घालून होळी सणाच्या अगोदर हा पुल हटविण्याची योग्य त्या सुचना द्याव्यात अशी मागणी गुरुद्वारा परिसरातील नागरिकांनी केली आहे.मा उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब व मा आ हेमंत भाऊ पाटील साहेब व नवीन माणसाला संधी दिल्यास काही तरी विकास कामे होतील हीच अपेक्षा ठेवून आपल्याला निवडणुकीत मोठ्या अपेक्षेने जनतेने आपल्याला विजयी केले असल्याचे जाणवते आजघडीला पाहिले तर तुम्ही जनतेचे आवडते आमदार म्हणून उदयास येत आहात.तुमच्या कार्याला मानाचा मुजरा आमदार आनंदराव पाटील बोंढारकर साहेब दक्षिण नांदेड विधानसभा सदस्य.

### नवस फेडून येणाऱ्या दाजी मेव्हण्यावर काळाचा घाला

# भीषण धडकेत एकाचे धडापासून शीर वेगळे तर दुसऱ्याचा खांद्यापासून हात तुटला

## एकाचा जागेवरच मृत्यू तर दुसऱ्याने ग्रामीण रुग्णालयात प्राण सोडला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीक्षेत्र माहूर । राजकिरण देशमूख**

माहूर तालुक्यातील मौजे पानोळा येथील एकाच कुटुंबातील वीस ते पंचवीस भाविक ऑटोद्वारे महादेवाचे नवस फेडण्यासाठी आर्णी तालुक्यातील मौजे पांगरी या गावी महादेव मंदिरात जाऊन पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून नवस फेडून परत येत असताना यापैकी दोघेजण मोटरसायकल वरून माहूरवरून वाई बाजार मार्ग पानोळा जात असताना मौजे उमरा येथील राष्ट्रीय महामार्गावर त्यांना अज्ञात वाहनाने जबर धडक दिल्याने प्रकाश परसराम राठोड वय ५२ वर्ष याचे धडापासून शिर वेगळे झाले तर भारत धनसिंग राठोड वय ५५ वर्षे यांच्या खांद्या जवळून हात मोडला या गंभीर धडकेत धडापासून शीर वेगळे झाल्याने प्रकाश जागीच गतप्राण झाला तर भारतने माहूरच्या ग्रामीण रुग्णालयात दम तोडल्याची घटना दि ३.३.२०२५ रोजी रात्री १० वाजता चे सुमारास घडल्याने प्रचंड हळहळ व्यक्त होत आहे

माहूर तालुक्यातील मौजे पानोळा येथील भारत धनसिंग राठोड वय ५५ वर्ष आणि प्रकाश परसराम राठोड आपल्या परिवारासोबत आर्णी तालुक्यातील पांगरी येथील महादेव मंदिरावर दरवर्षीप्रमाणे नवस फेडण्यासाठी पुरणपोळीच्या नैवेद्य घेऊन गेले होते परत येत असताना परिवारातील सर्व सदस्यांना त्यांनीऑटो द्वारे पाठवून दिले आणि दोघेजण मोटरसायकलने माहूर मार्ग पानोळा जात असताना मौजे उमरा फाट्याजवळ आले असता त्यांना अज्ञात वाहनाने जबर धडक दिली यामध्ये मोटरसायकल क्रमांक च.क२९ ऋ१२४२ चा चेंदामेंदा झाला तर प्रकाश परसराम जाधव यांचे शीर धडापासून वेगळे झाले तर भारत धनसिंग राठोड यांच्या डाव्या खांद्याला भयंकर दुखापत झाल्याने फासोळ्यापासून ते खांद्यापर्यंत हात तुटून शरीरातील हृदयापर्यंत भयंकर जखम झाल्याने ते खाली पडले रस्त्याने जाणाऱ्यांनी १०८ ला दूरध्वनीवरून कल्पना दिल्याने १०८ म्बुलन्स तात्काळ घटनास्थळावर पोहोचून गंभीर जखमी अवस्थेत जिवंत असलेले भारत राठोड यांना तात्काळ ग्रामीण रुग्णालयात आणले असता येथे उपचार दरम्यान त्यांचा मृत्यू झाला प्रकाश जाधव यांचे शीर जवळपास एक तास रस्त्यावरच होते त्यावरून अनेक वाहने गेल्याचे प्रत्यक्ष दर्शनी सांगितले घटनेची कल्पना मिळाल्याने सपोनि शिवप्रकाश मुळे यांनी लगेच घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करत प्रकाश जाधव यांचे शीर आणि धड स्थानिकांच्या मदतीने ग्रामीण रुग्णालयात आणले येथे घटनेची नोंद झाल्यानंतर दी ४ रोजी ग्रामीण रुग्णालयाचे डॉ अक्षय सांगळे आणि आष्टाचे डॉ संदेश राठोड यांनी शवविच्छेदन केले घटना इतकी गंभीर होती की रस्त्यावर रक्ताचा सडा पडलेला होता ट्रामा केअर सेंटर असते तर जखमींचा जीव वाचवला गेला असता अशी प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत होती एकाच घरातील जावई मेहुण्याचा अपघाती मृत्यू झाल्याने पानोळा गावासह तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे घटनेचा तपास सपोनी शिवप्रकाश मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेका गजानन चौधरी यांचे सह सिंदखेड पोलीस करीत आहेत





---

### 'दिल्लीत कृषी पर्यटन उद्योजकांची यशोगाथा' या पुस्तकाचे प्रकाशन

# प्रकाशन कट्ट्यावर विविध क्षेत्रातील ८० पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । मधुकर शिरेवार**

दिल्ली येथे झालेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये वसंत महिपती प्रकाशन कट्ट्यावर विविध जिल्हातील लेखकांचे वेगवेगवेगळ्या प्रकारचे साहित्याचे प्रकाशन करण्यात आले. यामध्ये साधारण ८० पुस्तकांचा समावेश होता. चपराक प्रकाशनाचे ब्रेल लिपीतील महत्त्वपूर्ण पुस्तकाचे ही प्रकाशन करण्यात आले.

महाराष्ट्राने देशाला कृषी पर्यटनाची ओळख करून दिली. या कृषी पर्यटनाच्या उद्योगाविषयीचे कृषी पर्यटन उद्योजकांची यशोगाथा या आगळ्यावेगळ्या पुस्तकाचे प्रकाशने यावेळेस करण्यात आले. महाराष्ट्रातील या १५ कृषी पर्यटन केंद्रांचे वार्षिक उलाढाल कोट्यावधींचा आहे. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार, गावाचा विकास, मूलभूत सोयीसुविधा, शेतकऱ्यांना सन्मानपूर्वक व आदरपूर्वक जीवन जगण्यासाठी प्रेरित करते. महाराष्ट्रात कृषी पर्यटन मोठ्या प्रमाणात विस्तारत आहे. पर्यटकांना गाव आणि शेती विषयी ओढ वाढत आहे. दिल्लीत होत असलेल्या साहित्य संमेलनात कृषी पर्यटन विषयावरती पुस्तक प्रकाशित होणं महाराष्ट्रासाठी अभिमनाची बाब आहे. साहित्य विश्वात कृषी पर्यटन नव्या आणि महत्वाच्या विषयीचे साहित्य प्रकाशित होत आहे. ही आनंदाची बाब आहे. असल्याचे निलम गोऱ्हे यांनी सांगितले. लेखक गणेश चप्पलवार यांनी २२ निकषांवर आधारित महाराष्ट्रातील कृषी पर्यटन केंद्राची निवड केली. प्रत्यक्षात भेट देऊन, मुलाखत घेऊन, सुरुवातीपासूनचा कृषी पर्यटन केंद्रांचा प्रवास, पर्यटनातील विविध टप्पे, आव्हाने वेगळेपण या आणि इतर निकषांच्या आधारे चढउतारांची गाथा या पुस्तकात मांडले आहे. या कृषी पर्यटनाच्या माध्यमातून लोककला, लोक साहित्य, लोकसंस्कृती, लोकनृत्य, कृषी, संस्कृती आणि ग्रामीण संस्कृतीचे दर्शन पर्यटकांना अनुभवता येते. कृषी पर्यटन हा सर्वसमावेशक प्रकल्प असल्यामुळे या माध्यमातून शेतकरी आपला शेती व्यवसाय विस्तार करत आहेत. महाराष्ट्रात आज घडीला एक हजार कृषी पर्यटन केंद्र आहेत. प्रत्येक कृषी पर्यटन केंद्राचं वेगळेपण असल्यामुळे शहरातील पर्यटक कृषी व ग्रामीण संस्कृतीचा आनंद घेण्यासाठी पसंती देत आहेत. कार्यक्रमाला नीलम गोऱ्हे, जेष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर, साहित्य अकादमी विजेत्या लेखिका संगीता बर्वे, साहित्य अकादमी विजेते लेखक एकनाथ आव्हाड, संजय नहार, बालभारतीच्या किशोर या मासिकाचे संपादक किरण केंद्रे, चपराक प्रकाशनाचे घनश्याम पाटील आणि लेखक गणेश चप्पलवार, पत्रकार सुजित शिंदे आणि विश्वभूषण लिमये आदी मान्यवर उपस्थित होते. संदीप वाघचौरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केलं. प्रकाशित करण्यात आलेल्या पुस्तकांमध्ये कथा, कविता, या सगळ्या प्रकारचा समावेश होता. त्याचसोबत ट्रेकिंग वर आधारित विश्वास कुळेकर लिखित पुस्तकाचे देखील यावेळी प्रकाशन झाले. त्याचबरोबर गणेश चप्पलवार यांचे कृषी पर्यटनावर आधारित पुस्तक देखील प्रकाशित करण्यात आले.




---

### लोकशाही पत्रकार संघाच्या निलंगा तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल

# इस्माईल महेबुब शेख यांचा महादेव विद्यालय धनेगाव येथे सत्कार संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । विष्णू मोहन पोले**

लोकशाही पत्रकार संघाच्या निलंगा तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल श्री महादेव विद्यालय धनेगाव च्या वतीने पत्रकार इस्माईल महेबूब शेख यांचा सत्कार करण्यात आला.लोकशाही पत्रकार संघ संपूर्ण भारतभर पसरलेला असून पत्रकार बांधवांच्या मदतीला धावून येणारा पत्रकार संघ आहे.अन्याय , अत्याचार, भष्टाचार यांच्या विरोधात निर्भिडपणे कार्य करणारे दैनिक लोकनेता पेपर चे निलंगा तालुका प्रतिनिधी यांची लोकशाही पत्रकार संघ निलंगा तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल श्री.महादेव विद्यालय धनेगाव चे प्राचार्य रामलिंग मुळे सर, पर्यवेक्षक श्री बंडगर सर, श्री पवार सर, श्री कौटुंबे सर, श्री भंडेसर, श्री बिजापुरे सर, श्री कांबळे सर होमगार्ड तपासे यांच्या उपस्थितीत दैनिक लोकनेता चे पत्रकार इस्माईल महेबुब शेख यांचा सत्कार करण्यात आला.

---

# सात वर्षीय रिजाकशफ शेख हिचा पहिला रोजा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । प्रतिनिधी**

मुस्लिम धर्मातील पवित्र रमजान महिन्याला २ मार्च पासून सुरू झाला आहे.हा महीना मुस्लिम बांधव पवित्र महिना मानला जातो. उस्माननगर येथील रिजाकशफ रफिक शेख या सहा – सात वर्षीय चिमुकल्या मुलीने पवित्र रमजानचा पहिला रोजा पूर्ण केला.त्याबध्दल रिजाकशफ शेख चा मुस्लिम धर्मातील बांधवांनी शुभेच्छा दिल्या आहेत. इस्लाममध्ये कलमा , नमाज , रोजा , जकात , हज हे पाच प्रमुख तत्व आहे. यात प्रत्येकाने रोजा ठेवणे बंधनकारक आहे . रमजान महिन्यात मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात रोजे ( उपवास ) करतात . मोठ्यासह लहान लहान मुल ,मुलीही रमजानचे उपवास करतात. यंदा २ मार्च पासून रमजान महिन्याला सुरूवात झाली. उन्हाची तीव्रता वाढत आहे. एवढ्या तापमानात



सात वर्षीय रिजाकशफ रफिक शेख हीने पहिला रोजा पूर्ण केला आहे. प्रामुख्याने ग्रामीण भागात सहा सात वर्षांपेक्षा लहान मुले रोजाचे उपवास धरत नाहीत. पण रिजाकशफ रफिक शेख ने पहिला रोजा करण्याचा हट्ट करून तो यशस्वी पणे पूर्ण केला. रोजा सोडण्यापूर्वी इफ्तार च्या वेळेवर रिजाकशफ शेखला नविन कपडे , हार घालण्यात आले. पहिला रोजा पूर्ण केल्याबद्दल गावातील मुस्लिम बांधव, सगे सोयरे यांनी रिजाकशफचे कौतुक केले व अभिनंदन केले.

---

# बेळकोणी खुर्द ता.बिलोली येथील श्रीकृष्ण देवस्थानची यात्रा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । नबाजी कुडकेकर**

बेळकोणी खुर्द नगरीमध्ये दरवर्षीप्रमाणे परंपरागत याही वर्षी यात्रेनिमित्त अनेक कार्यक्रम आयोजित केले गेले आहेत सर्वप्रथम दि.६/३/२०२५ रोजी पालखी सोहळा रात्रीला पार पडेल यामध्ये बाहेर गाऊन आलेल्या श्रीकृष्ण मंदिर कोलंबी देवाची काठी येथील देवकर गोपाळ मंडळी व तसेच गागलेगाव खैरगाव येथील काठी व देवकर मंडळी असंख्य भाविक येत असतात या उत्साहात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक श्रीकृष्ण देवाची भक्त मंडळी मोठ्या प्रमाणात सामील होतात पालखी सोहळा झाल्यानंतर पिक पाणी व राजकीय घडामोडी आपत्ती अशा अनेक गोष्टीचे भकीत सांगितले जातात तसेच दी.७/३/२०२५ रोजी जंगी कुस्त्याचा फड देखील आयोजित केलेला आहे यासाठी पंचक्रोशीतील अनेक पैलवान सामील होत असतात तसेच रात्री नृत्य व नाटक असे अनेक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केलेले आहेत तरी या कार्यक्रमाचा अस्वाद पंचक्रोशीतील लोकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून घ्यावा असे आव्हान सामाजिक कार्यकर्ते संदीप (संदेश) बाळके व यात्रा कमिटी आणि गावकरी मंडळी केले आहेत.





---

**अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांची शासकीय विश्रामगृह नांदेड येथे भेट घेऊन दिव्यांगांच्या प्रलंबित विविध न्याय मागण्यांसंदर्भात चर्चा केली असता यासंदर्भात पाठपुरावा करणार असल्याचे लोखंडे यांनी आश्वासन दिले (लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)**



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904